## ग्रंथाची अनुक्रमणिका

१. ‘हलाल’ म्हणजे काय ? ७
२. ‘हलाल’ चळवळीचा उद्देश १३
३. ‘हलाल’ संकल्पनेच्या वृद्धीचा इतिहास १४
४. ‘हलाल अर्थव्यवस्था’ : स्वरूप, विस्तार आणि प्रचार १७
५. ‘हलाल अर्थव्यवस्थे’चा आर्थिक आधार ‘हलाल प्रमाणपत्र (सर्टिफिकेट)’ ३५
६. ‘हलाल प्रमाणपत्रा’ची निरर्थकता ! ४२
७. ‘हलाल अर्थव्यवस्थे’चे दुष्परिणाम ४८
८. ‘हलाल अर्थव्यवस्था’ आणि ‘जिहादी आतंकवाद’ यांचा संबंध ! ५१
९. ‘हलाल अर्थव्यवस्थे’च्या संदर्भात हिंदूंची योग्य भूमिका आणि कृती ! ५८
१०. ‘हलाल अर्थव्यवस्थे’ला देश-विदेशांत होत असलेला विरोध ६८
११. ‘हलाल अर्थव्यवस्थे’च्या विरुद्ध ‘हिंदु जनजागृती समिती’चा लढा आणि यश ! ७६
१२. ‘हलाल’द्वारे चालू असणार्‍या ‘आर्थिक जिहाद’च्या विरोधात लढा द्या ! ८३

**सूचना** ‘धार्मिकतेचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम’ या संदर्भातील संशोधन आणि अभ्यास लोकांसमोर मांडला जावा, जेणेकरून देशाची अर्थव्यवस्था सुदृढ व्हावी, हा या ग्रंथाचा उद्देश आहे. कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणे किंवा कोणामध्ये तेढ निर्माण करणे, हा यामागील उद्देश नाही.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## ग्रंथाचे मनोगत

'सुखस्य मूलं धर्मः । धर्मस्य मूलमर्थः ।' (चाणक्यनीतिसूत्र, अध्याय १), म्हणजे 'सुखाचे मूळ धर्म आणि धर्माचे मूळ अर्थ आहे.' अशा प्रकारे सुख अन् धर्म यांच्या दृष्टीने 'अर्था'चे महत्त्व सांगितले आहे. धर्मशास्त्रानुसार धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांमध्येही अर्थाचा समावेश केलेला आहे. आजच्या काळात अर्थसंपन्न व्यक्तीच प्रभावशाली असते. अशा व्यक्तींचा राजकारणापासून ते देशाची नीती ठरवण्यापर्यंत प्रभाव असतो, तसेच अर्थसंपन्नतेमुळेच अमेरिका, इंग्लंड आदी देश पुढारलेले म्हणवले जातात आणि अनेक देशांवर ते दबावतंत्राचा वापर करतात ! म्हणूनच अर्थकारणाला फार महत्त्व आहे. त्यातही जगाच्या विनाशासाठी सिद्ध असणाऱ्या जिहाद्यांच्या हातात जर ही अर्थसत्ता गेली तर ...? या भीतीचे सद्यस्थितीत मुख्य कारण आहे, जगात सर्वांत शीघ्र गतीने वाढणारी इस्लामी शरीयतवर आधारित 'हलाल अर्थव्यवस्था'!

शरीयत आधारित 'इस्लामिक बँके'ला अनेक देशांत विरोध झाला; मात्र ग्राहक अधिकारांमुळे, तसेच कट्टर धर्मपालनाच्या आग्रहामुळे 'हलाल अर्थव्यवस्था' आज पुष्ट होतांना दिसत आहे. मुसलमानांकडून प्रत्येक पदार्थ आणि वस्तू इस्लामनुसार वैध अर्थात् 'हलाल' असण्याची मागणी केली जाऊ लागली आहे. त्यासाठी 'हलाल सर्टिफिकेट' अनिवार्य बनले. आश्चर्य म्हणजे 'सेक्युलर' भारतातील शासकीय आस्थापनांतही 'हलाल' अनिवार्य करण्यात आले. देशात केवळ १५ टक्के असणाऱ्या अल्पसंख्य मुसलमान समाजाला इस्लामनुसार संमत 'हलाल' मांस भक्षण करायचे आहे; म्हणून उर्वरित जनतेवरही ते लादण्यात येऊ लागले. आता तर हे 'हलाल सर्टिफिकेट' केवळ मांसापुरते मर्यादित न रहाता खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, औषधे, रुग्णालय, गृहसंस्था, मॉल, पर्यटन इत्यादी क्षेत्रांतही चालू झाले. इस्लामिक देशांत निर्यात करणाऱ्यांसाठी तर 'हलाल सर्टिफिकेट' बंधनकारकच बनले आहे. आज 'मॅकडोनॉल्ड'सारखी विदेशी आस्थापने हिंदूबहुल भारतात १०० टक्के 'हलाल' पदार्थ विक्री करून हिंदु ग्राहकांच्या धार्मिक अधिकारांचा अपमान करत आहेत ! यातून

निर्माण केल्या गेलेल्या 'हलाल अर्थव्यवस्थे'ने विश्वभरात दबदबा निर्माण केला असून तिने अल्पावधीतच २ अमेरिकी ट्रिलीयन डॉलर्सचा टप्पाही गाठला आहे.

जगभरात आज 'हलाल अर्थव्यवस्थे'चा उघडपणे आणि मोठ्या प्रमाणात विरोध केला जात आहे. ऑस्ट्रेलियाच्या संसदेत वाढत्या कट्टरतावादासाठी 'हलाल अर्थव्यवस्था' बळ पुरवत असल्याचा आरोप करण्यात आला असून त्यावर बंदी घालण्याची मागणीही करण्यात आली आहे.

जेव्हा पंथावर आधारित अर्थव्यवस्था उभी रहाते, तेव्हा देशाच्या विविध यंत्रणांवर त्याचा परिणाम निश्चितच होतो. येथे तर 'शरीयत'वर आधारित एक अर्थव्यवस्था उभी रहात आहे. त्यामुळे तिचा 'सेक्युलर' भारतावरही निश्चित परिणाम होणार आहे. या दृष्टीने 'भविष्यात स्थानिक व्यापाऱ्यांना, परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांना, उद्योजकांना तसेच अंतिमतः राष्ट्राला काय धोका संभवतो ?', याचा विचार करणे आवश्यक आहे. अशा वेळी भारताने वेळीच सावध व्हायला हवे ! भारत शासनाने 'हलाल सर्टिफिकेट' देणाऱ्या इस्लामी संस्था 'सर्टिफिकेट'च्या माध्यमातून गोळा केलेल्या धनाचा कसा वापर करतात ?', याची सखोल चौकशी केली पाहिजे. 'सेक्युलर' भारतात 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण' (FSSAI) सारखी शासकीय व्यवस्था असतांनाही 'हलाल सर्टिफिकेट' देणाऱ्या इस्लामी संस्थांची आवश्यकताच काय आहे ?

या पार्श्वभूमीवर हा ग्रंथ एखाद्या समाजाच्या धार्मिक श्रद्धेविषयी किंवा त्यांच्या धार्मिक अधिकारांविषयी प्रश्न करण्यासाठी अथवा त्यांचा अपमान करण्यासाठी नाही, तर भारतातील १०० कोटी हिंदु ग्राहकांच्या अधिकारांचा सन्मान होण्यासाठी, त्यांना त्यांच्या ग्राहक अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी, तसेच राष्ट्रापुढील एका संकटाची माहिती करून देण्यासाठी संकलित केला आहे ! 'हा ग्रंथ वाचून हिंदु ग्राहक जागृत व्हावा', ही भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना ! - **संकलक**